दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक ६० ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.३१ मे २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## रुपाली चाकणकर यांना जीवे मारण्याची धमकी



**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांना जीवे मारण्याची धमकी आलेली आहे. राष्ट्रीय महिला आयोगाच्या नवी दिल्लीच्या कार्यालयात हा धमकीचा फोन आलेला आहे. पुढच्या २४ तासांत रुपाली चाकणकर यांना जीवे मारु, असा धमकीचा फोन आज दुपारच्या सुमारास महिला आयोगाच्या कार्यालयात आलेला होता. अहमदनगरमधील व्यक्तीने फोन केल्याची माहिती मिळत आहे.

रुपाली चाकणकर यांना अशा धमकीचा फोन पहिल्यांदाच आलेला नाही. याअगोदरही दोन वेळा रुपाली चाकणकर यांना धमकीचे फोन आलेले होते. तुमचा कार्यक्रम करु, अशा प्रकारची भाषा त्या धमकीच्या फोनमध्ये वापरण्यात आली होती.

# सत्ताधाऱ्यांनी पनवेलकरांच्या तोंडचे पाणी पळविले

## विरोधकांची बघ्याची भूमिका

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**पनवेल शहरात महापालिकेच्या हद्दीत गेल्या १५ दिवसापासून पाण्याची वानवा निर्माण झाली आहे. सुरूवातीला आठवड्यातून एक दिवस पाणी येणार नसल्याचे नागरिकांना सांगितले गेले. परंतु कालांतराने दोन-दोन दिवस शहरात पाणी उपलब्ध होत नसल्याने नागरिकांचे तोंडाचे पाणी पळाले आहे. ही सत्ताधाऱ्यांकडून पनवेल शहर वासियांची फसवणूक असून त्याला विरोधी पक्षाकडूनही कोणताही विरोध होत नसल्यामुळे पनवेल शहरातील नागरिक संभ्रमात पडले आहेत.**



पनवेल शहरात गेल्या दोन महिन्यापासून आठवड्यातील एक दिवस पाणी येणार नसल्याची नागरिकांना सुचना देण्यात आली. परंतु ही नकळत सत्ताधाऱ्यांनी केलेली फसवणूक असून गेले १५ दिवसापासून शहरात पाण्याची वानवा निर्माण झाली आहे. नागरिकांकडून पाण्याची पाणीपट्टी थकली असल्यास महापालिकेकडून कारवाई केली जाते. मग सत्ताधाऱ्यांचे आणि विरोधकांचे पाणी देण्याचे आद्यकर्तव्य असताना नागरिकांची दिशाभूल करण्यामागे विरोधकांचा आणि सत्ताधाऱ्यांचा काय हेतू आहे? असा प्रश्न शहरातील नागरिकांना पडलेला आहे. सत्ताधारी शहराच्या विकासाचे गाजर दाखवून नागरिकांची जी फसवणूक करीत आहेत म्हणून त्याला विरोधकांनी विरोध करण्याचे सोडून ते ही यात सामील आहेत काय? असा प्रश्न शहरवासियांना पडला आहे. या विरोधात नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून सत्ताधारी त्याचप्रमाणे विरोधकांनाही पुढील येणाऱ्या निवडणुकीत शहरवासिय त्यांना त्यांची जागा दाखविल्याशिवाय राहणार नाहीत, असा मतप्रवाह शहरात दिसून येत आहे.





## उरण तालुक्यात पेट्रोल, डिझेलचा तुडवटा



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील एच.पी.आणि इंडियन आँईल पेट्रोल व डिझेल पंपावर पेट्रोल व डिझेलचा तूडवटा निर्माण झाला आहे. त्यामुळे वाहनचालकांना आप आपली वाहने पंपावर, रस्त्यावर पार्किंग करुन ठेवावी लागत आहेत.त्यामुळे वाहनचालक पुरते हैराण झाले आहेत.

उरण तालुक्याचा औद्योगिक दृष्ट्या झपाट्याने विकास होत आहे. त्यामुळे या तालुक्यात मोठ्या प्रमाणात वाहनांची रेलचेल सुरू असते. अशा वाहनांना इंधन म्हणून पुरवठा करणारे एच.पी. आणि इंडियन आँईलचे जवळ जवळ १६ पेट्रोल व डिझेल पंप आहेत. परंतु गेली तीन चार दिवसांपासून काही पेट्रोल व डिझेल पंपावर पेट्रोल व डिझेलचा तूडवटा निर्माण झाला आहे. त्यात संध्या तर तालुक्यातील १० ते १२ पेट्रोल व डिझेल पंपावर पेट्रोल व डिझेलचा पुरवठा बंद झाला आहे. त्यामुळे पेट्रोल व डिझेल भरण्यासाठी पंपावर ये- जा करणाऱ्या वाहनांना एकत्र आपली वाहने पेट्रोल व डिझेल अभावी पंपावर किंवा रस्त्यावर पार्किंग करुन ठेवण्याची वेळ आली आहे.

पेट्रोल पंप व्यापारी वर्गाने, असोसिएशनने कोणत्याही प्रकारची सुचना न दिल्याने आज वाहनात पेट्रोल व डिझेल नसल्याने अनेक वाहनचालकांना आप आपली वाहने पंपावर,रस्त्यावर पार्किंग करुन ठेवण्याची वेळ आली आहे. कारण तालुक्यातील सर्रास पेट्रोल पंपावर पेट्रोल व डिझेलचा तूडवटा निर्माण झाला आहे. याला जबाबदार हे पेट्रोल व डिझेल पंप चालवणारे व्यवसायिक आहेत. तरी यांची रायगड जिल्हाधिकारी डॉ महेंद्र कल्याणकर यांनी सखोल चौकशी करावी अशी मागणी मनसेचे उरण तालुका उपाध्यक्ष सत्यवान भगत यांनी केली आहे. उरण तालुक्यात सर्रास १६ पेट्रोल पंप आहेत. पेट्रोल व डिझेल असोसिएशन च संप असल्याचे आम्हाला समजत आहे. त्यामुळे पेट्रोल व डिझेलचा पुरवठा होऊ शकला नसेल तरी चौकशी करून उर्वरित माहिती देण्यात येईल असे उत्तर उरण पुरवठा अधिकारी बिरादार कडून सांगण्यात येत आहे.

# पनवेल महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त सुनिल मानकामे आज सेवानिवृत्त होणार

## कर्मचारी वर्गातून सहाय्यक आयुक्त पदावर नियुक्ती होणे ही महानगरपालिकेतील अभिमानास्पद बाब

**सुनिल मानकामे यांचा जन्म पनवेल नगरीत १९६४ साली झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण सरस्वती विद्या मंदिर व सराव पाठशाळा म्हणजेच आत्ताचे ट्रेनिंग कॉलेज हे जिल्हा परिषद कार्यालयाच्या बाजूला आहे. सध्या ही शाळा बंद आहे. त्यांचे पुढील शिक्षण व्ही. के. हायस्कूल येथे झाले. तर उच्च शिक्षणा करीता त्यांनी पनवेल येथील ए.एस. सी कॉलेज डोंबाळा येथे १९८१ ते १९८६ या वर्षात त्यांनी पुर्ण केले. बी कॉम पास झाल्यानंतर सुनिल मानकामे यांनी एल. एल. बी साठी ठाणे येथे ऍडमिशन घेतले परंतु आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना पुढील शिक्षण पूर्ण करता आले नाही.**

त्यांच्या वडिलांचा व्यवसाय हा टेलर काम करणे व त्यांच्यावरच संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी असल्याने त्यातच सुनिल मानकामे यांना दोन लहान भाऊ व घरात त्यांची आजी व सुनिल जन्मल्यापासून विधवा आत्या असा परिवार गुण्यागोविंदाने नांदत होता घरामध्ये एकटेच वडील कमवते असल्याने दुसरे उत्पन्नाचे साधन नव्हते, त्यामुळे अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये सुनिलने भावंडांचे शिक्षण पूर्ण केले. शिक्षण पूर्ण करत असताना आईला तिच्या वडिलांकडून अध्यात्मिक वारसा लाभल्याने तीला भजन करण्याची आवड आहे. त्यामुळे आईकडुन एकतारी, तबला, पेटी वाजवायला सुनिल मानकामे शिकले. उन्हाळ्याच्या सुट्टीत रद्दी पासून कागदी पिशव्या करणे, पापड, लोणची करणे, वडीलांच्या टेलरींग व्यवसायात मदत करणे, कपडे शिवणे नंतर काकांच्या हाताखाली ते घड्याळ दुरूस्ती देखील करीत असत. प्रत्येक कामात मन लाऊन शिकण्याची आवड जन्मजात सुनिलला असल्याने हातात पडेल ते काम करण्याची व शिकण्याची आवड निर्माण झाली. आर्थीक परीस्थीतीत फरक पडल्या नंतर बारावीनंतर सर्व भावंडांनी फटाक्याचा व्यवसायही केला. कटलरी, कपडे विकणे, सीजन व्यवसाय करणे एकंदरीत काय तर कुठुनतरी वडिलांना आर्थिक मदत करण्याचे काम सर्व कुटुंबाने केले. त्यातुन मिळणारे उत्पन्न व घर खर्च भागवत सुनिल मानकामे यांनी बीकॉम ची परीक्षा दिली आणि देवाने हाक ऐकली. सन १९८६ रोजी पनवेल नगरपरिषदेत सुनिल मानकामे कामावर रुजू झाले. कामावर रूजु होताच चाणाक्ष व हुशार मानकामे यांच्या असे लक्षात आले की पदोन्नतीसाठी LSGD व LGS या पदवीत्तर परीक्षा स्थानिक स्वराज्य संस्थेत पदोन्नतीसाठी अनिवार्य असल्याने सन १९८८ पदविका त्यांनी पूर्ण केली. नगरपरिषद काळामध्ये त्यांनी प्रथमता आस्थापना विभागात काम पाहिले, नंतर त्यांची बदली भांडार विभाग येथे करण्यात आली. त्यावेळेला भांडार विभागांमध्ये पथप्रकाश विभाग हा समाविष्ट होता. तसेच भांडार विभागाची खरेदी ही एकत्र केली जात होती. सर्व विभागाची खरेदी केवळ भांडार विभागामार्फत केली जात होती. त्यामुळे त्या विभागात नगरपरिषदेसाठी लागणारे साहित्य म्हणजेच टाचणी पासून पाणी पुरवठा साठी लागणारे साहित्य ब्लिचिंग पावडर, आरोग्य विभागा साठी लागणारी बीसीजी पावडर, शाळेसाठी लागणारे कपडे, गणवेश कामगारांसाठी चप्पल बूट व इतर साहित्य पावसाळी प्रावरणे, गाडी साठी लागणारे स्पेअर पार्ट, रुग्णालय व दवाखान्यामध्ये लागणारे औषधे व साहित्य खरेदीही एकाच भांडार विभागातून केली जायची त्यामुळे खुप मोठी जबाबदारी मानकामे यांच्यावर होती. त्यांच्या त्या वेळेच्या कार्यकाळात एक जीप गाडी रुग्णवाहिका, व्हॅक्युम मशीन, गाडी करीता अहमदाबादला जाऊन खरेदी केलेली होती. चोख व्यवस्थापनामुळे व कामात काटेकोरपणा यामुळे मानकामे यांना मालमत्ता कर वसुली विभागामध्ये रुजू केले गेले. सन १९९८ साली मानकामे यांनी स्वतः घरोघरी जाऊन प्रत्येक मालमत्तांची मोजणी करून त्याचे करनिर्धारण केलेले आहे. त्यानंतर नगरपालिकेमध्ये २०१५ पर्यंत कोणत्याही प्रशासकीय काळामध्ये घराची मोजणी झालेली नाही असे त्यांनी सांगितले. काही कालावधीनंतर त्यांना पाणीपुरवठा विभागांमध्ये कर संकलन करण्यासाठी रुजू करण्यात आले. त्यानंतर बांधकाम लेखा, अंतर्गत लेखा परीक्षण विभाग, आरोग्य विभाग, रुग्णालय दवाखाना अशा विविध विभागांमध्ये सुनिल मानकामे यांनी काम केलेले आहे. तसेच वेळोवेळी होणाऱ्या राज्य व केंद्र सरकार मार्फत केले जाणारे सर्वेक्षण म्हणजेच नारु निर्मूलन, कुटुंब नियोजन, पशुगणना, पोलिओ निर्मूलन, जनगणना, सर्व मतदार याद्या अद्यावत करणे, निवडणुकांच्या मतदान प्रक्रीयेत प्रत्यक्ष सर्व प्रकारच्या पदावर काम केलेले आहे. तसेच नगर परिषदेमार्फत विविध होणारे कार्यक्रमासाठी लागणारे नियोजनही मानकामे यांनी अतिशय शिस्तबद्ध पध्दतीने केले.



शब्दांकन
अरविंद पोतदार

१९९४ साली सुनिल मानकामे यांना (एम एम आर डी ए मुंबई) येथे संगणक प्रशिक्षण देण्यात आले. मुख्याधिकारी ए ए कारचे, डॉक्टर उदय टेकाळे व अजिज शेख यांनी विशेष संगणक प्रणाली बाबत मेहनत घेतली होती. संगणकीय शिक्षणामुळे मानकामे यांनी १९९५ साली पाणीपट्टी व मालमत्ता कराची बीले नागरिकांना दिली होती. परंतु त्यावेळेला स्थानिक अधिकाऱ्यांनी संगणक प्रणालीला तीव्र विरोध दर्शवून सदर प्रणाली बंद केली, हे विशेष त्यांनी बोलताना कथन केले जर का त्या वेळेला संगणक प्रणालीला मदत केली असती, तर आज महाराष्ट्रातच नव्हे देशात, पहिली नगरपालिका संगणकामार्फत मालमत्ता कर व पाणीपट्टी दिले देणारी झाली असती असे वैयक्तिक मतही त्यांनी प्रकट केले.

सन २०११ साली विवाह आस्थापना विभागात मानकामे रुजू झाले त्या वेळेला तेथे फक्त चार लोक कार्यरत होते त्यावेळेला सुद्धा मानकामे यांनी सहाव्या वेतन आयोगाचा फरक देणे वारसा पद्धतीने नवीन नियुक्त्या करणे अनुकंपा तत्त्वाने नोकरी देण्यासाठी प्रतीक्षा यादी बनवून जिल्हाअधिकारी यांच्याकडे यादी पाठवुन वरीष्ठ अधिकारी यांचे मार्गदर्शन घेऊन त्याचा पाठपुरावा करणे अशा विविध प्रकारची कामे तसेच नगरपरिषदेच्या सर्व कर्मचाऱ्यांचा साठी कॅशलेस आरोग्य विमा योजना त्यांनी राबवण्यात पुढाकार घेतला होता. त्यामुळे सफाई कामगारांची आरोग्याची विशेष काळजी घेतली होती. दिनांक १ -१० -२०१६ रोजी महापालिका स्थापन झाली त्यावेळेला ते प्रशासनामध्ये कार्यरत होते त्यावेळी मानकामे यांची चक्क तीन महिन्यात तीन ठिकाणी बदली करण्यात आली होती जन्म मृत्यू विभाग, लेखा परीक्षण विभाग व लेखा विभाग व नंतर पुन्हा प्रशासनामध्ये बदली करण्यात आली होती.

गणेश देशमुख यांची पनवेल महापालिकेच्या आयुक्तपदी नियुक्ती झाल्यावर प्रथम त्यांनी कामगार हिताच्या व आश्वासित प्रगती योजने पदोन्नती देण्यासाठी समिती गठीत केली व त्या समितीनी सर्व कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली. सुनिल मानकामे व आयुक्त गणेश देशमुख यांचा संपर्क त्यांच्या नियुक्ती दिनांकापासून आला. अपुरे मनुष्यबळ व नवीन महापालिकेशी साठी लागणारे आर्थिक बळ तसेच प्रलंबित कामे नागरिकांची ओरड नगरसेवक इतर माननीय सभासद यांचा महापालिका झाल्यामुळे त्यांच्या अपेक्षा वाढल्या होत्या त्या पुऱ्या करण्यासाठी माननीय आयुक्त गणेश देशमुख यांनी भराभर निर्णय घेतले. त्यामध्ये प्रथमता त्यांनी स्टाफ पॅटर्नचा आखाडा तयार करून नगर विकास विभागामध्ये सादर केला नंतर कर विभागातील मालमत्ता कराची आकारणी बाबत आढावा घेतला.

कर विभागाची अवस्था फार बिकट होती अपुऱ्या मनुष्यबळामुळे वसुलीसाठी व नवीन आकारणीसाठी काम विलंबाने सुरू होते त्यामुळे आयुक्त गणेश देशमुख यांनी सुनिल मानकामे यांची त्या ठिकाणी नियुक्ती केली. १-८-२०१८ रोजी मालमत्ता कर विभागांमध्ये मानकामे पदभार स्वीकारला त्यावेळेस मदतनीस जोशी, परवे, देशमुख व इतर दोन कर्मचारी असे मिळून फक्त पाच जण काम करत होते. त्यावेळेला त्यांच्या खात्यात शिपाई पण नव्हता तसेच त्या विभागाला अपुरी जागा होती सुनिल मानकामे यांनी मालमत्ता कराची डिमांड पाहिली असता एकूण रू. ३५-४० कोटी मागणी होती. मालमत्ता कर विभागामध्ये करआकारणी करणेकामी मागील १२-१३ साला पासुन ई प्रणाली पासून प्रलंबित होत्या व करआकारणी वाजवी वार्षिक भाडे मूल्य दर ठरवणे व इतर अनुषंगिक कामे प्रलंबित होती. वेळोवेळी माननीय आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली संजय शिंदे उपायुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही कर प्रणाली निश्चित केली. त्यामुळे आज महापालिके साठी ९५० कोटी इतकी मागणी निश्चित झालेली आहे. यासाठी दिवसरात्र काम करून व अत्याधुनिक प्रणालीचा वापर करून संपूर्ण मालमत्ता कर संगणकीय पद्धतीने करण्यासाठी मला वेळोवेळी माननीय आयुक्त व उपायुक्त तसेच माझे कर्मचारी यांनी मन लावून काम केलेले आहे. मालमत्ता कर आकारणीचे काम एकट्याचे नसून हे एक टीम वर्क आहे या टीम वर्क मध्ये आम्ही सर्वांनी वेळेचे बंधन न पाळता काम केलेले आहे. या काळात वैयक्तिक कामे बाजूला ठेवून सुट्टीच्या दिवशी सुद्धा आम्ही काम केलेले आहे असे मानकामे यांनी सांगितले. तसेच २०२० साली कोरोना महामारी मध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणात मानकामे यांनी काम केलेले आहे. रूम मध्ये डाटा कलेक्शन टीमचे काम पाहिलेले आहे. आज ते निवृत्त होताना महापालिकेचे व पूर्व पूर्वाश्रमीच्या नगरपालिकेचे कामकाज केलेले आहे. अध्यात्माची लहानपणापासून आवड असल्याने मी आज पर्यंत भीमाशंकर दर्शन पायी केलेले आहे. तसेच पैठण ते मायंबा पायी कावड यात्रा, २९ वर्षापासून करत आहे. श्री अमरनाथ यात्रा, श्री गिरनार यात्रा, श्री आय्याप्पा स्वामी यात्रा व इतर देवदर्शन केलेले आहे. मी अमरनाथ यात्रा एक संस्मरण हे पुस्तक स्वतः लिहिलेले असून त्याचे प्रकाशन माननीय आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते दिनांक ३१/०५/२०२२ रोजी होणार आहे. आणि याच दिवशी मी पनवेल महानगरपालिकेच्या सेवेतुन निवृत होत आहे असे सुनिल मानकामे यांनी शेवटी सांगितले.

# पनवेल मधील गुलशन इमारतीच्या पुनर्विकास प्रकरणात नियम बसवले धाब्यावर

## बांधकाम थांबविण्याचा न्यायालयाचा निर्णय

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल मध्ये एका इमारतीच्या पुनर्विकास प्रकरणाची रंजक माहिती समोर आली आहे. मयत अब्दुस तुंगेकर यांच्या आत्म्याने येऊन मृत्युपश्चात वे–ळोवेळी सभा, अजेंडे, निर्णय यावर स्वाक्षर्या केल्याची धक्कादायक माहिती हाती लागली आहे. सदर प्रकरणाची तक्रार करणाऱ्यांना त्या तक्रारीतून काही विशिष्ट लोकांची नावे वगळण्याच्या वास्तवास देखील सामोरे जावे लागले आहे.

याबाबत सविस्तर हकिकत अशी आहे की तक्रारदार आदिम मुल्ला आणि रमिझ मुल्ला यांच्या वडिलांची प्लॉट क्रमांक २७८/४ मुल्ला अब्दुल हमीद मार्ग येथे जागा होती.१९९४ साली या ठिकाणी गुलशन नावाची इमारत उभारण्यात आली. सदर इमारतीमध्ये १२ सदनिका तर सहा व्यावसायिक स्वरूपाचे गाळे निर्माण करण्यात आले. पैकी दोन सदनिका आपल्यापाशी ठेवून त्यांच्या वडिलांनी बाकीची मालमत्ता विक्री केली.१९९७ मध्ये त्यांच्या वडिलांनी नगरपरिषदेची रीतसर परवानगी घेऊन इमारती मध्ये सातव्या गाळ्याची निर्मिती केली. २००७ मध्ये ३०९ क्रमांकाची सदनिका तक्रारदार यांच्या चुलत भाऊ झैद नूर मुल्ला याला बक्षीस पत्राद्वारे देण्यात आली.२००८ साली नगरपरिषदेच्या रीतसर परवानगीने मुल्ला कुटुंबीयांनी सातव्या गाळ्यांमध्ये मेझनिन फ्लोअर बांधला. त्यानंतर दोन वर्षांनी म्हणजे २०१० साली गुलशन इमारतीमधील रहिवाशांनी गुलशन सोसायटी फॉर्म केली. नोंदणीकृत दस्त नसल्याचा ठपका ठेवत सोसायटीने मुल्ला कुटुंबियांना सदनिका क्रमांक १०४ आणि गळा क्रमांक सात यांना सोसायटीमध्ये समाविष्ट करण्यास नकार दिला. असे असले तरीदेखील सर्व सदस्यांनप्रमाणेच या दोन मिळकतीचा मेंटेनन्स मात्र सोसायटी नित्यनेमाने घेत होती. कालांतराने तक्रारदार यांचे वडील यांनी गळा क्रमांक सात हा बक्षीस पत्राद्वारे रमीझ मुल्ला आणि आदिम मुल्ला यांच्या नावे केला.

मार्च २१ मध्ये मुल्ला बंधूंना सोसायटीच्या पुनर्निर्माण विषयाबाबत बैठकीसाठी पाचारण करण्यात आले. सदर बैठकीत पुनर निर्माणासाठी विकसक म्हणून मंगेश



परुळेकर यांची निवड झाल्याचे सांगण्यात आले. ही बैठक माननीय सहाय्यक निबंधक यांच्या उपस्थितीत पार पडत होती हे विशेष.आदिम मुल्ला आणि रमिझ मुल्ला यांनी यापूर्वी पुनरनिर्माण विषयक कुठलाही पत्रव्यवहार सोसायटीकडून मिळाला नसल्याचे ठणकावून सांगितले. तसेच अंतिम स्तरापर्यंत गोष्टी आल्या असून सुद्धा कित्येक रहिवाशांना अंधारात ठेवण्यात आले. त्यामुळे सदरच्या पुनर्निर्माण प्रक्रियेला विरोध दर्शवून त्यांनी बैठक सोडली.

पुनर्निर्माण करायचेच असा चंग बांधून सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी पनवेल महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांसमवेत नियमबाह्य पद्धतीने दस्तावेज निर्माण केले. यात कित्येक रहिवाशांच्या पुनर्निर्माण प्रक्रियेतील दस्तावेजोंवर खोट्या स्वाक्षऱ्या करण्यात आल्या आहेत. तक्रारदार आदिम मुल्ला आणि रमिझ मुल्ला यांच्या देखील खोट्या स्वाक्षऱ्या केल्याचे उघडकीस आले. विशेष म्हणजे १४.०१.२०२० रोजी मृत झालेल्या अब्दुस सालाम तुंगेकर या सोसायटीमधील सदस्याच्या त्यांच्या मृत्यूपश्चात बैठका अजेंडे आदी दस्तावेजतयार तयार करताना खोट्या स्वाक्षऱ्या केलेल्या आढळून आल्या. सहाय्यक निबंधक यांच्या कार्यालयातून पुनर्निर्माण बाबत कागदपत्रांची प्रत मागवली असता हा सारा खोटेपणा उघड झाला.

असे असून देखील धोकादायक इमारत असल्याचे प्रमाणपत्र पुढे करत पुनर्निर्माण प्रकल्प पुढे रेटण्यात आला.आदिम मुल्ला आणि रमिझ मुल्ला यांनी न्यायालयात धाव घेतली. दिवाणी स्तर न्यायालयाने सदर इमारतीचे बांधकाम थांबविण्याचे आदेश पारित केले आहेत. झालेल्या फसवणुकीच्या प्रकरणात आदिम मुल्ला आणि रमिझ मुल्ला यांनी पनवेल शहर पोलीस स्थानकांमध्ये संबंधित व्यक्तींवर गुन्हा दाखल केला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

उच्च न्यायालयातील उन्हाळी सुट्टी विशेष कोर्टाने देखील दिवाणी न्यायालयाच्या बांधकाम थांबविण्याच्या निर्णयास दुजोरा दिला आहे. सदर पुनर्विकास प्रक्रिया साठी देण्यात आलेली वर्तमान पत्र जाहीर निविदा नोटीस नुसार निविदा मागवायचा कालखंड संपल्यानंतर सुमारे महिनाभर उशिराने विकसकाने निविदा दाखल केल्याचे देखील उघड झाले आहे. सदर प्रकल्पात संपूर्ण प्रक्रिया, पुनर्निर्माण प्रक्रिया यांना लागू असणारे सगळे नियम धाब्यावर बसवण्याचा विक्रम प्रस्थापित करण्यात आला आहे. याच मुद्द्यावर तक्रारदार रमिझ मुल्ला आणि आदिम मुल्ला हे सहाय्यक निबंधक यांच्याकडे अपील करणार आहेत.

# नगरपरिषदेच्या सभागृहातील सभांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करून ते वेबसाईटवर प्रसिद्ध करणे गरजेचे

**दै.रायगड नगरी । माथेरान**



नगरपरिषदेच्या सभागृहात विकास कामांसंदर्भात अथवा गावाच्या पायाभूत सुविधांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी जे काही महत्वपूर्ण ठराव सभेत घेतले जातात त्याची माहिती सर्वसामान्य लोकांना सुध्दा माहीत असावी जेणेकरून आपण निवडून दिलेले लोकप्रतिनिधी खरोखरच आपल्या प्रभागाविषयी प्रश्न मार्गी लावतात की फक्त सभागृहात खुर्ची गरम करण्यास जातात याची इत्यंभूत माहिती मिळणे निदान सध्याची येथील राजकीय परिस्थिती आणि जे काही गौडबंगाल होत असते त्याची चर्चा गावभर होत त्यामुळेच आगामी काळात तरी माथेरान नगरपरिषदेच्या सभागृहातील सभांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करून ते वेबसाईटवर प्रसिद्ध करणे गरजेचे बनले आहे. नगरपरिषदेचे कामकाज हे खऱ्या अर्थाने पारदर्शक व्हावे या एकमेव उद्देशाने याबाबत नुकताच नगरपरिषद प्रशासन संचालयाचे आयुक्त तथा संचालक डॉ. किरण कुलकर्णी यांनी राज्यातील सर्व नगरपरिषदेच्या मुख्याधिकार्यांना आदेश दिले आहेत.माथेरान मध्ये मागील काळात याबाबत माजी विरोधी पक्षनेते शिवाजी शिंदेंनी सभागृहात ही पद्धत सुरू करावी असे स्पष्टपणे सूचित केले होते परंतु एकहाती सत्ता शिवसेनेची असल्याने याबाबत गांभीर्याने घेतले नव्हते. त्यामुळेच काही विकास कामे पूर्ण करण्यासाठी संबंधित ठेकेदारांना कामे देण्यासाठी स्टँडिंग मीटिंग मध्ये विषय मंजूर केले जात होते. नंतर सर्वसाधारण सभेत अगोदरच मंजूर केलेल्या विषयांचे वाचन केले जायचे त्यामुळे अनेकदा माजी विरोधी पक्षनेते शिवाजी शिंदेंनी आ–पला प्रखरपणे विरोध दर्शविला होता.नगरपरिषदेच्या सभागृहातील सभांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करून ते वेबसाईटवर प्रसिद्ध करणे ही पद्धत मागील काळात जर का सुरू झाली असती तर कदाचित गावाची कामे चांगल्या पद्धतीने आणि सकारात्मक विचाराने झाली असती आजपर्यंत जी काही घाईगडबडीत कामे पूर्ण करण्यासाठी जो काही सपाटा लावला होता त्यावर मोठया प्रमाणावर अंकुश राहिला असता नागरिकांनी सुध्दा आपल्या सूचना व्यक्त करून सर्व कामे पारदर्शक आणि टिकाऊ झाली असती असे सुज्ञ नागरिक बोलत आहेत.

आम्ही अगदी पहिल्या दिवसापासून अशा प्रकारची मागणी करत होतो परंतु १४ जणांच्या बहुमताच्या सत्तेला ती हिंमत दाखवता आली नाही. पारदर्शक कारभार करणार होते मग आडपडदा कशासाठी यांच्या चुकीच्या कामाची लक्तरे गेल्या पाच वर्षांत विरोधी पक्ष म्हणुन कॉंग्रेसचे एकमेव नगरसेवक विरोधी पक्षनेते शिवाजी शिंदे यांनी काढली होती.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सर्वसामान्यांचा आधारवड असलेले माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा गुरुवार दिनांक ०२ जून रोजी ७१ वा वाढदिवस आहे. त्यांच्या वाढदिवसानिमीत्त दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करण्यासाठी येणाऱ्या हितचिंतक शुभेच्छुकांनी पन–वेल येथील निवासस्थानी किंवा कार्यालयात न येता ०२ जून रोजी न्हावा खाडी येथे आयोजित करण्यात आलेल्या अभिष्टचिंतन सोहळ्यास तसेच ज्येष्ठ नागरिक सत्कार समारंभ, रुग्णवाहिका लोकार्पण, संस्कृतीचे दर्शन असलेल्या 'मी मराठी' कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन उत्तर रायगड जिल्हा भाजप व श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.



राजकारणापेक्षा समाजकारणाला महत्व देणारे दानशूर व्यक्तिमत्त्व म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा सुपरिचय आहे. सामाजिक बांधिलकी जपणारे नेतृत्व म्हणून त्यांचा नावलौकिक आहे. गरीब गरजूंना मदतीचा हात देऊन त्यांनी नेहमीच सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम केले आहे. गेल्या चार दशकात त्यांनी राजकारणाबरोबरच सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात कायमच भरीव योगदान दिले आहे. आणि त्यांच्यावर सर्व क्षेत्रातील लोकांचे प्रेम आहे व तो नेहमीच वृद्धिंगत झाला आहे. त्या अनुषंगाने ०२ जून रोजी न्हावा खाडी येथील म्हसेश्वर मंदिराशेजारील क्रिकेट मैदानावर सायंकाळी ०६ वाजता लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा अभिष्टचिंतन सोहळा होणार आहे. सदर सोहळ्यादरम्यान ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार समारंभ होणार आहे. तत्पूर्वी सायंकाळी ५. ३० वाजता आमदार महेश बालदी यांच्यावतीने उलवा नोड करिता देण्यात येणा–या रुग्णवाहिका व शववाहिकेचे लोकार्पण होणार आहे. त्यानंतर सायंकाळी ०७ वाजता महाराष्ट्र शिरोमणी लोकशाहीर विठ्ठल उमप थिएटर प्रस्तुत व नंदेश उमप निर्मित लोककलांतून महाराष्ट्राच्या वैभवशाली संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या 'मी मराठी' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करण्यासाठी येणाऱ्या हितचिंतकांनी पनवेल येथील निवासस्थानी किंवा कार्यालयात न येता ०२ जून रोजी न्हावा खाडी येथे होणाऱ्या समारंभास उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

# उरणचे किनारे मच्छिमार नौकांनी गजबजले

## मासेमारी बंदीनंतर दोन महिन्याच्या विश्रांतीसाठी हजारो नौका किनाऱ्यावर शाकारल्या

**दै.रायगड नगरी । उरण**

जून महिन्यापासून खोल समुद्रातील मासेमारीला सरकारने बंदी घातली असल्यामुळे उरणचे किनारे मच्छिमारी नौकांनी गजबजून गेले आहेत. मच्छिमारांनी आपल्या मच्छिमारी नौका समुद्र किनारी शाकारून (नांगरून) ठेवल्या आहेत. उरण तालुक्यातील मोरा बंदर, करंजा बंदर, दिघोडे येथे हजारो नौका सध्या विसावा घेत आहेत. १ जून ते ३१ जूलै पर्यंत खोल समुद्रातील मासेमारी बंद असते. उरण तालुक्यात मोठ्या प्रमाणात मासेमारीचा व्यवसाय चालतो.

जून–जूलै हा महिना माश्यांचा प्रजननाचा आणि अंडी देण्याचा आणि या महिन्यात समुद्र खवळलेला असल्यामुळे १ जून ते १ ऑगस्ट या दरम्यान खोल समुद्रातील मासेमारीवर शासनाचे बंधन असते. मच्छिमार बांधव देखिल या काळात खोल समुद्रातील मासेमारी करत नाहीत. या दोन महिन्याच्या काळात ते आपल्या होड्यांची दुरूस्ती, रंगरंगोटी, जाळी सुधारणे अशा प्रकारची कामे करतात. खरं तर दरवर्षी राज्यात १५ ऑगस्ट किंवा नारळी पौर्णिमेपैकी जो दिवस आधी येईल त्यादिवशी मासेमारीवरची बंदी उठवली जायची. पण इतर राज्यातली बंदी १ ऑगस्टला उठवतात. त्यामुळे बाहेरचे मच्छिमार याठिकाणी येऊन व्यवसायाला सुरुवात करायचे. त्यामुळे इथल्या मच्छिमारांचं नुकसान व्हायचं. त्यामुळे देशभरातल्या सर्वच किनारपट्टी भागातल्या बंदी कालावधीत सुसूत्रता आणण्यासाठी प्रशासनाकडून १ जून ते ३१ जुलै असा बंदी कालावधी ठरवण्यात आला आहे. जीवावर उदार होउन मासेमारी करून आपली उपजिवीका करणाऱ्या मासेमारांची महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात संख्या आहे. १५ लाखाच्या वर कुटूंबे मासेमारी व्यवसायावर अवलंबून आहेत. या मासेमारी व्यवसायातून देशाला मोठे परकिय चलन मिळते. एकट्या महाराष्ट्रात जवळ जवळ ४लाख ६८ हजार मेट्रीक टन मासळी पकडली जाते. उरण तालुक्यात देखिल मच्छिमारांची संख्या लक्षणीय आहे.

# केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांच्या हस्ते जिल्ह्यातल्या २६ बालकांना लाभ आणि सेवांबाबत किटचे वाटप



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

कोविड–१९ मुळे अनाथ झालेल्या रायगड जिल्ह्यातल्या २६ बालकांना लाभ आणि सेवा बाबतच्या किटचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात महाराष्ट्रातील रायगड येथून केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील सहभागी झाले आणि रायगड परिसरात कोविड महामारीमुळे पालक गमावलेल्या २६ अनाथ मुलांना त्यांनी मुलांसाठीच्या पीएम केअर्स लाभार्थी किट्सचे वाटप केले. यामध्ये १८ वर्षावरील ०६ तर १८ वर्षाखालील २० अनाथ बालकांचा समावेश आहे.

या प्रसंगी पंचायत राज, केंद्रीय राज्यमंत्री श्री.कपिल पाटील म्हणाले की, कोविड–१९ मुळे अनाथ झालेल्या बालकांना मदतीचा हात देण्याचा हा एक भावनात्मक असा कार्यक्रम होता. या काळात अनाथ झालेल्या बालकांची जबाबदारी केंद्र सरकारने घेतली आहे. पंतप्रधान श्री.मोदी यांनी पंतप्रधान म्हणून नाही तर या बालकांचे पालक म्हणून या कार्यक्रमाच्या माध्यमातून या अनाथ बालकांशी संवाद साधला. देशाचे पंतप्रधान किती संवेदनशील आहेत, हे यावरून दिसते. या बालकांच्या भविष्याची चिंता मिटविण्यासाठी भारत सरकारबरोबरच महाराष्ट्र सरकारनेही योगदान दिले आहे. प्रधानमंत्री केअरमध्ये देशाच्या अनेक लोकांनी त्यांचा निधी दिलेला आहे, याचा अर्थ असा की, या देशातल्या १३० कोटी जनतेने खऱ्या अर्थाने या सगळ्या अनाथ बालकांचे पालकत्व स्विकारले आहे, हे विशेष कौतुकास्पद आहे.

शेवटी या अनाथ बालकांच्या आई वडिलांनी त्यांच्यासाठी पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी आपली सर्वांची आहे, आई–वडील नसण्याची कमतरता भासू नये यासाठी विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या व्यक्ती, संस्थांनी या बालकांना भावनिक, आर्थिक, सामाजिक आधार देण्यासाठी पुढे यावे, त्यांच्या पालकांसाठी हीच खरी श्रद्धांजली ठरेल, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनीही यावेळी या अनाथ बालकांशी संवाद साधला. या बालकांना धीर देवून त्यांनी या बालकांना त्यांच्या पुढील आयुष्यात ज्या क्षेत्रात स्वत:चे करिअर घडवायचे आहे, त्यासाठी सर्वतोपरी मदत करण्याची खात्री दिली. स्पर्धा परिक्षेचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या बालकांनी जिल्हा प्रशासनाने सुरू केलेल्या गरूडझेप स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्राचा निश्चित लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी या बालकांना केले.

या कार्यक्रमासाठी उपस्थित अनाथ बालकांमधील एका बालकाने स्पर्धा परिक्षेची तयारी करीत असल्याचे सांगितले असता जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी तत्परतेने या बालकासाठी स्पर्धा परिक्षा पुस्तकांचा संच उपलब्ध करून देण्याविषयी संबंधितांना निर्देश दिले. तसेच या बालकास जिल्हा प्रशासनाने सुरू केलेल्या गरूडझेप स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्रांतर्गत नियमित मार्गदर्शन मिळेल, याचीही तातडीने व्यवस्था केली.

**अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात**
**जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग, जि.रायगड**

क्रमांक/हक्कनोंद/अपिल क्र.२६०/२०२१

१) श्रीम.कुसूम पांडुरंग पाटील
२) श्रीम.गुलाब धनाजी पाटील
अ.क्र.१ व २ रा.देवळोली, पो.रसायनी, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्रीम.हिराबाई शंभू भोईर
रा.भाताण, पो.सोमटणे, ता.पनवेल, जि.रायगड — अपिलार्थी

विरुद्ध

१) श्री.अनंता चांगू पाटील
रा.डेरवली, पो.अजिवली, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्री.नामदेव बाळाराम धुमाळ
रा.डेरवली, पो.अजिवली, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्री.दत्तात्रेय नामदेव मुकादम
४) श्री.दिलीप नामदेव मुकादम
५) श्रीम.कुंदा पांडुरंग भोईर
६) श्रीम.नंदा शंकर पवार
७) श्रीम.मंदा नामदेव वाजेकर
८) श्रीम.सुरेखा अरुण दळवी
अ.क्र.३ ते ७ रा.शिरढोण, ता.पनवेल, जि.रायगड
९) श्री.गोपीनाथ महादू वाजेकर
रा.शिरढोण पाडा, पो.शिरढोण, ता.पनवेल, जि.रायगड
१०) श्रीम.आंबु गणेश भोईर
रा.डेरवली, पो.अजिवली, ता.पनवेल, जि.रायगड
११) श्रीम.संगीता नरेश म्हात्रे
रा.खालचे ओवळे, पो.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड
१२) मे.साईराज कन्स्ट्रक्शन तर्फे श्री.हनुमंत पांडुरंग चव्हाण
रा.ऑफिस नं.११०७, ११ वा मजला, रियल टेक पार्क,
एन आर टी बी मॉल जवळ, फ्लॅट नं.३९/२,
सेक्टर नं.३०/ए, वाशी, नवी मुंबई–४००७०३
१३) श्री.किरणकुमार भगवान बकाले
रा.लॅन्ड ले आऊट, तिरुपती नगर, जि.बुलढाणा–४४३३०१
१४) श्री.निर्भय वैजनाथ कोरे
रा.एम आय डी सी रोड, अग्रोया नगर, लातूर–४१३२१२
१५) श्री.विवेक व्याघेश्वर जोशी
रा.ए/४०२, श्री गणेश आशिष को.ऑ.हौ.सोसायटी लि.,
प्लॉट नं.९८, शनि मंदिराजवळ, साई विभाग,
अंबरनाथ पूर्व, जि.ठाणे–४२१२०१
१६) श्री.सुनील दगडू म्हसकर
रा.काळुंद्रे, पो.ओएनजीसी, ता.पनवेल, जि.रायगड — उत्तरार्थी

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार अपिल**

या जाहीर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे : डेरवली, ता.पनवेल, जि.रायगड येथील सर्व्हे नं. /हिस्सा नं.७८/२ क्षेत्र ०–२९–६ आकार ०.३१ या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी या न्यायालयात दि.१३/१०/२०२१ रोजी अपिल दाखल केले आहे. सदर अपिलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होवू शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर अपिलामध्ये दि.०८/०६/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे न्यायालयात सुनावणी निश्चित करण्यात आलेली आहे. तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास आपले गैरहजेरीत सुनावणी होवून निकाल दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १७/०५/२०२२

**सही/–**
**अपर जिल्हाधिकारी करिता**

## ग्रामपंचायत कोळखे

ता.पनवेल, जि.रायगड

### जाहीर निविदा

दि. ३०/०५/२०२२

प्रति,
अधिकृत / अनुभवी ठेकेदार,

यांस कळविण्यात येते की, ग्रामपंचायत कोळखे हद्दीतील खालील विकासकामे करावयाची आहेत. त्याकरिता ग्रामंपचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि. ३१/०५/२०२२ ते ०६/०६/२०२२ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि. ०७/०६/२०२२ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत ३ वाजेपर्यंत उघडण्यात येतील. कामांकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रामपंचायत कोळखे यांच्या नावाने डिमांड ड्राफ्टच्या द्वारे / रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. इसारा रक्कम अंतिम देयकातून कापून घेतली जाईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | इसारा रक्कम १% | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | पेठ येथील विठ्ठल रुक्मिणी सभागृह रंगरंगोटी व दुरुस्ती करणे | २०३९०४/– | २०३९/– | ३ महिने |

**अटी व शर्ती :–**

१) सर्वांत कमी दराचे अथवा कोणतेही टेंडर मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

२) सदर काम पंचायत समितीकडील बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणेचे आहे त्याचे मूल्यांकनाप्रमाणे बील अदा करण्यात येईल.

३) काम ज्यांच्या नावे मंजूर होईल त्यांनी नियमा प्रमाणे रूपये १०० स्टॅम्प पेपरवर बॉण्ड करून देणे.

४) कामाचे एस्टीमेंट ऑफिस वेळेत पहावयास मिळेल.

५) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास बिल अदा करणे अगर न करणे याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

**सही/–**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत कोळखे**

**सही/–**
**सरपंच**
**ग्रामपंचायत कोळखे**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## लोखंडी पुलानंतर आता नळपाईपलाईन चोरीला गेल्याची तक्रार


**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

नगरपंचायतीच्या ताब्यातील सावंतकोंड, पार्टेकोंड प्रभाग क्रमांक १ मध्ये नळपाणीपुरवठा करण्याची पाईपलाईन चोरीला गेल्याची तक्रार काँग्रेस शहर अध्यक्ष अमोल भुवड यांनी पोलादपूर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी महादेव रोडगे यांच्याकडे दिली आहे.

यापूर्वी याच ठिकाणी असलेल्या लोखंडी पुलाची चोरी झाल्यानंतर एफआयआर दाखल होताच पुलाचे तुकडे घटनास्थळी आढळून आले होते. काँग्रेस शहरअध्यक्ष अमोल भुवड यांनी त्या घटनेसंदर्भातील आरोपी अटक करण्यासाठी उपोषणाचा इशारा दिला असताना पुन्हा चोरीची घटना झाल्याने शहरामध्ये खळबळ उडाली आहे. पोलादपूर तालुक्यात भंगारमाफियांनी अनेक विकासकामे खोदून चोरल्याच्या घटना गेल्या वर्षभरात झाल्या असून त्याकडे सपशेल दूर्लक्ष केले गेले आहे.

पोलादपूर नगरपंचायतीच्या हद्दीतील प्रभाग क्रमांक १ मध्ये दोन महिन्यांपूर्वी एक लोखंडी पुल कापून चोरून नेण्याची घटना पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल झाल्याने चर्चेत आली होती. मात्र, गुन्हा दाखल होऊन आरोपी पकडण्याआधीच तुकडे तुकडे केलेला लोखंडी पुल घटनास्थळी अज्ञात इसमांनी आणून ठेवल्याने याबाबत कोणताही तपास झाला नाही. या घटनेबाबत सर्वश्रृत आरोपींची चर्चा पोलादपूर शहरात होत असताना आता याच सावंतकोंड पार्टेकोंड परिसरातील नागरिकांना नळाद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी टाकण्यात आलेली भुमिगत पाईपलाईन चोरीस गेल्याचे सोमवारी सकाळी ग्रामस्थांना समजून आले. त्यामुळे काँग्रेसतर्फे विधानसभा युवक अध्यक्ष ॲड.सचिन गायकवाड, नगरसेवक स्वप्नील भुवड आणि काँग्रेस शहरअध्यक्ष अमोल भुवड यांनी मुख्याधिकारी महादेव रोडगे यांना याप्रकरणी पोलीस तपास होऊन कारवाई होण्याकामी एफआयआर दाखल करण्यासाठी निवेदन दिले.

पोलादपूर तालुक्यात अनेक ठिकाणी रस्त्यालगतच्या रेलिंगचे कठडे, पुलाचे कठडे, लोखंडी पूल, स्मशानाचे आयबीम लोखंडी खांब, वादळामुळे कोसळलेले विजेचे लोखंडी खांब आदी विकास कामांशी निगडीत वस्तुंची भंगार माफियांनी सर्रास चोरी करण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली असून याबाबत प्रशासनाकडून फारसे गांभिर्याने बघितले जात नसल्याने सर्वश्रृत चोरांची उदयास आलेली जमात तालुक्यात प्रतिष्ठा प्राप्त करीत असल्याचे दिसून येत आहे.



# ‘देवदूत’ कल्पेश ठाकूरचा आदर्श घेऊन तरूणांनी सामाजिक कार्यासाठी पुढे यावे : अशोक दुधे

**दै.रायगड नगरी । पेण**

स्वतःचा व्यवसाय सांभाळून मागील सतरा वर्षे मुंबई – गोवा महामार्गावरील अपघातग्रस्त प्रवाशांसाठी विनामूल्य सेवा देणारे कल्पेश ठाकूर सारख्या ध्येयवेड्या तरुणांमुळे समाजाचं भलं होऊन इतिहास रचला जातो असे गौरवोद्गार रायगडचे पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांनी पेण येथे पोलीस मदत केंद्र व सीसीटीव्ही उद्घाटन कार्यक्रमात बोलताना केले.

दादर सागरी पोलिसांनी मुंबई – गोवा महामार्गावरील आंबिवली येथे उभारण्यात आलेल्या पोलीस चौकीचे तसेच या महामार्गावर बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेरेचे उदघाटन रायगडचे पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी झालेल्या कार्यक्रमास अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, उप विभागीय अधिकारी श्रीमती विभा चव्हाण, पेण पोलीस ठाण्याचे निरीक्षक देवेंद्र पोळ, वडखळ पोलीस ठाण्याचे निरीक्षक बाळा कुंभार, दादर सागरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गोविंद पाटील,



उद्योजक यशवंत घासे, कोपर सरपंच नवनाथ म्हात्रे यांच्या सह पोलीस कर्मचारी, ग्रामसुरकक्षा रक्षक आदी उपस्थित होते. यावेळी रायगड पोलिसांतर्फे महामार्गावरील अपघातग्रस्तांना मदत करणाऱ्या पेण येथील कल्पेश ठाकूर यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलतांना पोलीस अधीक्षक अश–ोक दुधे म्हणाले कि, मागील सतरा वर्षे या महामार्गावरील अपघातग्रस्तांना स्वतः तन, मन व धनाने विनामूल्य सेवा देणाऱ्या कल्पेशला देण्यात आलेली देवदूत ही उपमा योग्यच आहे. आज समाजाला अशा ध्येय वेड्या तरुणांची गरज असून कल्पेश सारखे आणखी दानशूर सामाजिक कार्यकर्ते निर्माण झाले पाहिजेत. एक जीव जरी वाचला तरी आपण आयुष्यात खूप काही मिळवले असे समजले पाहिजे. सर्वांच्या सहकार्याने पोलिसांचे काम होत असते; समाजाचा सहभाग वाढेल तेवढे काम सोपे होते, असे दुधे यांनी यावेळी म्हटले. गुन्हे रोखण्यासाठी रायगड जिल्ह्यात सीसीटीव्हीचे जाळे उभारणार असल्याचे दुधे यांनी सांगितले. पोलीस प्रशासन हे काम करतच आहे, मात्र या साठी समाजातील दानशूर व्यक्तींनी पुढे यावे असे आवाहन देखील त्यांनी केले.

आज पोलिसांची नकारात्मक प्रतिमा रंगवली जात आहे. मात्र अनेक आव्हानांचा सामना आमचा पोलीस कर्मचारी करत असतो. मुंबई मध्ये फक्त दोन तास ट्राफिक सिग्नलला उभे राहून दाखवा असे सांगताना आमचा कर्मचारी ऊन, वारा, पाऊस ,धूळ, प्रदूषण यांचा सामना करत बारा बारा तास उभा असतो. गावांत उभारण्यात आलेल्या ग्रामसुरकक्षा दलाची स्थापना करण्यात आलेली आहे या ग्रामसुरकक्षा दलात तरुणांनी सहभागी व्हावे असे आवाहन अधीक्षक अशोक दुधे यांनी यावेळी केले. कल्पेश ठाकूर पोलीस प्रशासनाच्या पुढे जाऊन काम काम करत असल्याचे अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी यावेळी म्हटले. यावेळी दादर सागरी पो–लीस ठाण्याच्या क्षेत्रातील ग्रामसुरकक्षा दलाच्या सदस्यांना टीशर्ट, टोपी व शिट्टी यांचे वाटप करण्यात आले.

# कळंबोलीत श्री शनिदेव जयंती उत्साहात साजरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

हिंदू कॅलेंडरनुसार शनिदेवाचा जन्म ज्येष्ठ महिन्याच्या अमावस्येला झाला होता. त्यामुळे दरवर्षी या तिथीला शनिदेवाची जयंती साजरी केली जाते. आज (सोमवार ३० मे) शनी जयंती कळंबोलीतील सेक्टर १४ येथील श्री शनी मंदिरात उत्साहात साजरी करण्यात आली. यावर्षी शनी जयंतीदिनी सोमवती अमावस्येचाही योग आलेला आहे. कळंबोलीतील शनी मंदिरात कळंबोली वसाहतीसह परिसरातील असंख्य भाविकांनी दर्शनाचा व प्रसादाचा लाभ घेतला.



सोमवारी सकाळी ६ वाजल्यापासून शनिदेवांच्या दर्शनाला भाविकांनी रांग लावली होती. रात्री १० वाजेपर्यंत भाविकांसाठी दर्शन खुले ठेवण्यात आले होते. सकाळी ६:३० वाजल्यापासून मंदिरात होमहवन, पूजा, अभिषेक आदी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आलेल्या भाविकांसाठी अभिजित पाटील मित्र मंडळाच्यावतीने चहा, नाश्ता, खिचडी, पाणी वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कळंबोलीत गेल्या ६ वर्षांपासून नित्यनेमाने शनी जयंती साजरी केली जाते. या मंदिराचा जीर्णोद्धार सुदाम गोकुळ पाटील यांच्या माध्यमातून करण्यात आला. या मंदिरात शनी जयंतीसह शनी अमावस्या आणि इतर धार्मिक कार्यक्रमांचे आयोजनही दरवर्षी केले जाते. ६ वर्षांपूर्वी मंदिराची स्थापना झाल्यानंतर दोन वर्षांनी सिडकोकडून हद्दीतील सर्व मंदिरांवर कारवाई झाली. त्यावेळी शनी मंदिरालगतच्या विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे आरसीसी स्लॅबही निष्कसित करण्यात आले होते. परंतु शनी मंदिरावर तोडक कारवाई दरम्यान दोन्ही पोकलन मशिनरीच्या साहाय्याने शनी देवांची शीळा त्याठिकाणाहून उचलण्यासाठी प्रयत्न केले गेले. परंतु दोन्हीही पोकलन मशिन्स त्याठिकाणाहून शनिदेवांची शिळा हलविण्यात असमर्थ ठरल्या. त्यामुळे हा केवळ शनी देवांचा चमत्कार असल्याचे येथील नागरिक सांगतात. या मंदिराचा महिमा सर्वदूर पसरला असून दर शनिवारी भाविक नित्यनेमाने शनिदेवांच्या दर्शनासाठी रीघ लावतात.

# सक्षम युवा प्रतिष्ठान आयोजित रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । माथेरान**

मिरारोड परिसरातील प्रणय हरवंदे हे सक्षम युवा प्रतिष्ठानचे सदस्य म्हणून कार्यरत होते. प्रणय यांनी कमी वयातच १७ वेळा रक्तदान केले होते.परंतु एका अपघातामध्ये त्यांचे निधन झाले. रक्तदान चळवळीसाठी सदैव झटणारा कार्यकर्ता अशी त्यांची विशेष ओळख होती. त्यांच्या अशा अपघाती निधनानंतर सक्षम युवा प्रतिष्ठानने आपल्या या मित्राच्या स्मृतीप्रित्यर्थ, या रक्तदात्याचा सन्मान म्हणून सक्षम युवा प्रतिष्ठानच्या वतीने रक्तदाता कै. प्रणय प्रदिप हरवंदे यांच्या २६ व्या जन्मदिनाचे औचित्य साधून प्रेमा लक्ष्मण विद्यालय पेणकरपाडा मिरारोड पूर्व येथे रक्तदान शिबिर घेण्यात आले.

रक्तदान शिबिराचे यंदाचे दुसरे वर्ष होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीला व कै. प्रणय हरवंदे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत अभिवादन करून या शिबिराची सुरूवात करण्यात आली. त्यानंतर सक्षम प्रतिष्ठान चे कै. प्रणय हरवंदे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मागील वर्षी लावण्यात आलेल्या रोपट्याला मान्यवरांनी पुष्पहार व पाणी अर्पण केले.या शिबिरात परिसरातील रक्तदात्यांनी उत्स्फुर्त सहभाग घेत ७४ जणांनी रक्तदान केले.या शिबिरात जमा झालेला रक्तसाठा मिरा भाईंदर महानगरपालिका भारतरत्न राजीव गांधी रक्तकेंद्र यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

यावेळी प्रेमलक्ष चॅरिटेबल ट्रस्टचे कार्याध्यक्ष दिपेश गावंड, सभापती तथा नगरसेविका अनिता पाटील, नगरसेवक मोहन म्हात्रे, पोलीस उपनिरीक्षक निखील चव्हाण, उपशहर संघटक रिया म्हात्रे यांनी शिबिरास भेट दिली. शिबिर यशस्वितेसाठी सक्षम युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितेश म्हात्रे, कार्याध्यक्ष अविनाश सुर्यवंशी, खजिनदार भूषण कोळी, उपाध्यक्ष रितेश पाटील, प्रदिप हरवंदे, प्रज्ञा हरवंदे, प्राची हरवंदे (आंबूर्ले) मितेश म्हात्रे, प्रथमेश जाधव, गणेश जंगले, देवेंद्र रासम, राहुल पाटील, विशाल गोहील, हर्षा सुर्यवंशी, सुजाता घुगे, पिंकी भिलारे, राजेश गोंधळी, निखील कांबळी, कुंदन नंदी मित्रपरिवारानीं परिश्रम घेतले. त्यासोबतच रक्तदात्यांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था देखील करण्यात आली होती.

सदर शिबिरात रक्तदान करणाऱ्या रक्तदात्याला कै. प्रणय हरवंदे यांची आठवण म्हणून एक भेट वस्तू तसेच रक्तदान प्रमाणपत्र तसेच उपस्थित मान्यवरांना तुळशीचे रोपटे सन्मानपूर्वक देण्यात आले. शेवटी सक्षम युवा प्रतिष्ठान व हरवंदे परिवाराच्या वतीने सर्वांचे आभार मानून रक्तदाता कै.प्रणय हरवंदे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# जास्त नफ्याचे आमिष दाखवून केली सात लाख सात हजारांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ऑनलाईन ट्रेडिंग गुंतवणुकीमध्ये नफा असल्याचे आम्ही दाखवून सात लाख सात हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार खारघरमध्ये उघडकीस आला आहे. आरोपी विरोधात खारघर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खारघर, सेक्टर २१ येथील सरीथा बहार ह्या नेटवरून ट्रेडिंग कंपन्यांच्या संदर्भाने माहिती घेत होत्या. ऑक्टोबर २०२१ मध्ये त्यांना एका व्यक्तीने फोन केला व युके मधून बोलत असून त्यांची ट्रेडिंग कंपनी असल्याचे सांगितले. यावेळी पैसे गुंतवल्यास जास्त नफा होईल अशी माहिती दिली.

त्यामुळे बहार यांनी सात लाख सात हजार रुपये गुंतवले. यावेळी पैशांचा नफा एका महिन्यानंतर खात्यावर दिसून येईल असे समोरील व्यक्ती माईक हे बोलत होते. बहरा याना त्यांच्या कंपनीच्या खात्यावर डॉलरवर रक्कम दाखवत असे. त्यानंतर काही दिवसांनी माईक याने बँक खात्यावर जमा होणाऱ्या रकमेच्या वर आयआरबीने टॅक्स लावला आहे असे सांगून अधिकची रक्कम मागणी केली. व माइक हा त्यांना पैसे मागितल्यानंतर उडवाउडवीचे उत्तर देऊ लागला. त्यामुळे फसवणूक झाल्याचे लक्षात येताच बहार यांनी खारघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

# पालीत नालेसफाईची कामे युद्धपातळीवर विशेष टीम आणि यंत्रसामग्रीचा वापर

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

नव्याने स्थापित झालेल्या पाली नगरपंचायत तर्फे अष्टविनायक तीर्थक्षेत्र पाली शहरातील नालेसफाईच्या कामांना युद्धपातळीवर सुरुवात झाली आहे. विशेष म्हणजे विशेष टीम आणि यंत्रसामग्रीचा वापर करून ही नालेसफाई केली जात आहे. यामुळे येत्या पावसाळ्यात नाले तुंबण्याची शक्यता नसल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

या नालेसफाईच्या कामांना १२ तारखेपासून सुरुवात झाली आहे. आत्तापर्यंत वाघजाई नगर, गुरांचा दवाखाना, उंबरवाडी, बेगर आळी, सावंत आळी, आगर आळी, भोईआळी, बुरुड आळी, राम आळी, मधली आळी, कासार आळी, बाजार पेठ, कुंभार आळी, एकता पथ आळी, खडक आळी, सोनार आळी, वरचा व खालचा मोहल्ला, स्मशानभूमी मार्ग, बल्लाळेश्वर मंदिर परिसर व देऊळवाडा परिसरातील नाले व गटारांची साफसफाई पूर्ण झाली आली आहे. येत्या ७ ते ८



दिवसांत उर्वरित पाली शहर, झाप गाव व परिसरातील नाले व गटारांची साफसफाई पूर्ण होईल असे स्वच्छता व वैद्यक सार्वजनिक आरोग्य समिती सभापती विनायक जाधव यांनी सांगितले.

नाले सफाईसाठी भाडे करारावर १० कामगारांच्या टीमची नियुक्ती केली आहे. आणि त्यांच्या जोडीला नगरपंचायत सफाई कामगार आहेत. सर्व जण युद्ध पा–तळीवर नालेसफाईची कामे करीत आहेत. याबरोबरच जेसीबी, ट्रॅक्टर आदी यंत्रसामग्रीचा देखील वापर केला जात आहे. नाल्यातील प्लास्टिक बॉटल, प्लास्टिक कचरा, झाडेझुडपे व गाळ पूर्णपणे काढून टाकला जात आहे. मातीने बुजलेली गटारे खोदण्यात आली आहेत. मे अखेर नालेसफाईची कामे पूर्ण होतील. यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# सामाजिक कार्यकर्ते कृष्णा महाडिक देणार त्या आदिवासी कुटुंबाला घर

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यात पहाटे घराची भिंत कोसळून आदिवासी कुटुंब संकटात सापडले होते. त्याची दखल तळा तहसीलदार श्री.कनशेट्टी आणि सामाजिक कार्यकर्ते कृष्णा महाडिक यांनी घेतली आणि त्यांना तळा ते मुंबई पर्यंत मदत केली आता कृष्णा महाडिक यांनी घर बांधून देण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे या आदिवासी कुटुंबाला मोठा आधार मिळणार आहे.

चरई आदिवासी वाडी येथील मुकणे कुटुंबावर नियतीने घाळा घातला आणि पहाटेच्या सुमारास निद्रा अवस्थेत चार मुलांवर भित कोसळली या अपघातात एका आठ वर्षीय मुलीचा जागीच मृत्यू झाला तर तिघे गंभीर जखमी झाले आज या घटनेचा या परिवाराने एवढा धसका घेतला की त्या कुटुंबाला त्या घरात राहताही येत नाही. मुकणे दांपत्याला चार मुले. घरची परिस्थिती गरीब असल्याने रोजंदारीवर कामाला जाऊन ते आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. घर कधीही कोसळू शकते अशी परिस्थिती नवीन घर बांधायचे तर पैसा नाही. त्यामुळे त्या कुटुंबावर मोठे संकट उभे राहिले आहे. सरकारी यंत्रणांकडूनही मुकणे कुटुंबाला मदतीचा हात मिळाला नाही. नवीन घर बांधायला कुणाचा तरी आधार मिळेल का, या विवंचनेत असतानाच आता सामाजिक कार्यकर्ते कृष्णा महाडिक यांनी पुढाकार घेतला आहे.

मुंबईतील उद्योगपती सुमन रमेश तुलासियानी हे या आदिवासी बांधवांना घर बांधून देणार आहेत. आदिवासी बांधवावर आलेले हे संकट दूर करण्याच्या दृष्टीकोनातून उद्योगपती सुमन रमेश तुलासियानी त्यांना पक्के घर बांधून देणार आहेत आदिवासी कुटुंबाची जबाबदारी स्वीकारण्यासाठी तुलसियानी यांनी सामाजिक कृतज्ञता म्हणून केलेली मदत इतरांनाही



प्रेरणा देणारी ठरणार आहे. कृष्णा महाडिक आणि रमेश तुलसियानी यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. दि.२७ मे रोजी चरई आदिवासी वाडी येथे मुकणे यांचे नवीन घर बांधण्यासाठी भूमिपूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते या भूमिपूजन सोहळ्यास उद्योगपती रमेश तुलसियानी, सामाजिक कार्यकर्ते कृष्णा महाडिक, तहसीलदार श्री.कनशेट्टी, चरई आदिवासी वाडी येथील शिक्षिका कल्याणी गायकर, श्री.लाड, मुकणे कुटुंबीय तसेच आदिवासी वाडी येथील ग्रामस्थ महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## श्रीवर्धन नगरपरिषद, श्रीवर्धन

### जाहिर ई–निविदा सूचना क्र.ई–०५/२०२२–२३

श्रीवर्धन नगरपरिषद महाराष्ट्र शासन सा.बां./म.जी.प्रा.विभागाकडील नोंदणीकृत आणि योग्य त्या वर्गातील ठेकेदार / मजूरी सहकारी संस्था यांचेकडून खालील कामाकरिता ऑनलाईन पद्धतीने निविदा मागवित आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदेची रक्कम | निविदा फॉर्म फी (रुपये) | इसारा रक्कम (रुपये) | सुरक्षा अनामत रक्कम | | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | रोखीने | बिलातून | |
| १ | श्रीवर्धन नगरपरिषदेचे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाकडे जाणेसाठी पोच रस्त्याचे डांबरीकरण करणे. | १४९०३८४.०० | २०००.०० | १४९०४.०० | ३ टक्के | ६ टक्के | ६० दिवस |
| २ | नारायण पाखाडी रस्त्याचे डांबरीकरण करणे. | २१५६९१८.०० | २०००.०० | २१५७०.०० | ३ टक्के | ६ टक्के | ६० दिवस |
| ३ | वाळवटी नाका ते जीवना पुलापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | २२८७६४०.०० | २०००.०० | २२८७६.०० | ३ टक्के | ६ टक्के | ६० दिवस |
| ४ | वरचा जीवना रस्त्यास नगरपरिषदेचे पंपरुमजवळ मोरी बांधणे. | १२६६१३७.०० | २०००.०० | १२६६१.०० | ३ टक्के | ६ टक्के | ९० दिवस |
| ५ | आयार मोहल्ला येथे मदरसाजवळ पऱ्यावर स्लॅब टाकणे. | १०३९३७०.०० | २०००.०० | १०३९४.०० | ३ टक्के | ६ टक्के | ९० दिवस |
| ६ | खालचा जीवना स्मशानभूमीमध्ये दशक्रिया विधीसाठी शेड बांधणे. | २२११८४७.०० | २०००.०० | २२११८.०० | ३ टक्के | ६ टक्के | ९० दिवस |
| ७ | मुळगांव कोळीवाडा येथे गांधी मैदानालगत संरक्षण भिंत बांधणे. | ३०९८५४३.०० | २०००.०० | ३०९८५.०० | ३ टक्के | ६ टक्के | ९० दिवस |
| ८ | श्रीवर्धन नगरपरिषद प्रशासकीय इमारतीचे दुरुस्ती करणे. | १२७६१२५.०० | २०००.०० | १२७६१.०० | ३ टक्के | ६ टक्के | १८० दिवस |

उपरोक्त ई–निविदा बाबतची फॉर्मची विक्री, स्वीकृती व निविदा उघडण्याची कार्यवाही खालीलप्रमाणे राहील.

१) निविदा प्रसिद्धी दिनांक ३०/०५/२०२२ रोजी दुपारी १०.०० वाजता.

२) निविदा फॉर्म ऑनलाईन उपलब्ध दिनांक ३०/०५/२०२२ दुपारी ११.०० पासून ते दि.१३/०६/२०२२ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत.

३) निविदा फॉर्म ऑनलाईन स्वीकृती दिनांक ३०/०५/२०२२ दुपारी १.०० पासून ते दि.१३/०६/२०२२ रोजी सायंकाळी १.०० वाजेपर्यंत.

४) निविदा लिफाफा १ (ऑनलाईन) उघडण्यास दिनांक १४/०६/२०२२ रोजी दुपारी १.०० वाजलेपासून सुरूवात करण्यात येईल. निविदेतील सर्व कामांची तांत्रिक बोली परिपूर्ण झालेनंतर आर्थिक बोलीचा लिफाफा २ उघडणेची कार्यवाही केली जाईल. त्यावेळी संबंधित निविदाकार यांनी उपस्थित राहणे बंधनकारक राहील. तसे न केल्यास निविदांबाबत कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

निविदा फॉर्म विक्री व स्वीकृतची संपूर्ण कार्यवाही वरील कालावधीत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर करण्यात येत आहे. सविस्तर निविदा सूचना अटी शर्ती सहित www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. या निविदा सुचनेबाबत अधिक माहिती श्रीवर्धन नगरपरिषद कार्यालयामध्ये बांधकाम विभागामध्ये उपलबध होईल.

क्र.श्रीनप/बांध/कात–२/०२४५/२०२२–२३
श्रीवर्धन नगरपरिषद कार्यालय, श्रीवर्धन
जि.रायगड, दिनांक २७/०५/२०२२

सही/–
(विराज लबडे)
मुख्याधिकारी तथा प्रशासक
श्रीवर्धन नगरपरिषद

# संक्षिप्त...

## म्हसळा तालुका संजय गांधी निराधार अनुदान योजनेचे २८ प्रस्ताव मंजुर

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

श्रीवर्धन मतदार संघाच्या आमदार तथा रायगड जिल्हा पालकमंत्री आदिती तटकरे यांनी नव्याने गठित केलेल्या म्हसळा तालुका संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीचे अध्यक्ष पदाची जबाबदारी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी तथा तालुका कुणबी समाज युवा कार्यकर्ते महेश शिर्के यांच्याकडे देण्यात आली आहे.

समिती अध्यक्ष महेश शिर्के यांनी पहिल्या आठवड्यात म्हसळा तहीलदार कार्यालयात पहिली पाहुणचार सभा घेऊन संजय गांधी निराधार योजना समितीचे काम आणि कार्य प्रसार करीत मा.रायगड जिल्हाधकाऱ्यांचे आदे–शानुसार घेण्यात आलेल्या सभेत म्हसळा तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेच्या २८ लाभार्थ्यांचे प्रस्ताव मंजुर करण्यात आले आहेत.समिती सभेपुढे ३२ प्रस्ताव सादर करण्यात आले होते मात्र त्यातील ४ प्रस्तावात त्रुटी राहिल्या असल्याने परिपुर्ण २८ प्रस्ताव मंजुर झाले असल्याचे समिती अध्यक्ष महेश शिर्के यांनी माहिती देताना सांगितले. म्हसळा तहसीलदार तथा समिती सचिव समीर घारे यांचे कार्यालयात समिती अध्यक्ष महेश शिर्के यांच्या अध्क्षतेखालील संपन्न झालेल्या सभेला नायब तहसिलदार डी.जे.पाटिल, गट विकास अधिकारी वाय.एम.प्रभे, समिती सदस्य महादेव पाटील, शमीम रियाज फकी, सुनिल लाखन, मोरेश्वर पाटील, निशा पाटिल, समीर काळोखे, रमेश जैन उपस्थित होते.

खासदार सुनिल तटकरे, पालकमंत्री आदिती तटकरे यांनी आमचेवर म्हसळा तालुका संजय गांधी निराधार योजना समितीची जबादारी दिली असता सदर अनुदान योजने अंतर्गत तालुक्यातील वंचीत लाभार्थ्यांना शासन योजनेचा लाभ देण्यासाठी म्हसळा तालुका समिती चांगले काम करून गोर गरीबांना सेवा देण्याचे काम करेल असा विश्वास समिती अध्यक्ष महेश शिर्के यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले.

सभेत संजय गांधी निराधार योजना अनुदान सर्वसाधारण योजने अंतर्गत १४ प्रस्ताव,श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना अनुदान अंतर्गत ११ प्रस्ताव, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजना अंतर्गत २ प्रस्ताव, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती वेतन योजना अंतर्गत १ प्रस्ताव मिळुन एकुण २८ प्रस्ताव मंजुर करण्यात आले आहेत.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# वाहतुकीच्या बदलामुळेच माथेरानच्या प्रगतीचा आलेख उंचावणार?

**दै.रायगड नगरी । माथेरान**

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात नवनवीन बदल घडून येत आहेत. खेडोपाडी सुद्धा विकासाची गंगा वहात आहे. गाव तिथे रस्ता ही शासनाची संकल्पना असल्याने ज्या ज्या ठिकाणी सुविधा निर्माण होऊ शकतात त्याठिकाणी शासनाच्या वतीने विकासात्मक कामे आजही युद्धपातळीवर सुरू आहेत. त्यामुळे खेडेगावात सुध्दा आमूलाग्र बदल घडताना दिसत आहेत. जोपर्यंत स्वतःच्या उन्नती साठी आणि प्रगतीसाठी, स्वतः मध्ये, स्वतः च्या व्यवसायात बदल घडवून आणू शकत नाहीत. स्वयंस्फूर्तीने आणि स्वयंखुषीने नागरिक पुढाकार घेत नाहीत तोपर्यंत गाव, शहरे प्रगती करू शकत नाहीत. अशाचप्रकारे माथेरान मधील हातरीक्षा चालकांनी इथे पिढ्यानपिढ्यापासून अर्थातच माथेरानचा शोध लागून जवळपास १७२ वर्षे पूर्ण झाली आहेत तरीसुद्धा आजही माणसाने माणसाला ओढून न्यावयाची अमानवीय प्रथा इथे एखाद्या गुलामगिरी प्रमाणे सुरुच आहे. त्यामुळे आपल्याला सुध्दा सन्मानाचे जीवन जगता आले पाहिजे. आधुनिक युगाप्रमाणे आपल्या व्यवसायात सुध्दा बदल झाल्याशिवाय गत्यंतर नाही अन्यथा भावी पिढी समोर अंधकारमय जीवन उभे ठाकणार आहे. निदान आपल्या पिढीला सुध्दा सन्मानाचे जीवन जगता आले पाहिजे हातरीक्षा ओढून भविष्यातील प्रगतीचा आलेख प्राप्त करता येणे अशक्यप्राय बाब आहे. त्यासाठी मागील दहा वर्षांपासून येथील हातरीक्षा चालकांनी पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही याची खात्री करून इथे पर्यावरण पूरक ई रिक्षा सुरू व्हावी यासाठी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केला आहे. आणि अखेरीस त्यास यश येण्याची चिन्हे स्पष्टपणे दिसून येत आहेत.



त्यामुळे या हातरीक्षा चालकांना स्वाभिमानाने जीवन जगणे शक्य होणार आहे. या ई रिक्षा मुळे शालेय विद्यार्थ्यांना दूरवर शाळेत जाण्यासाठी उत्तम सोय उपलब्ध होणार असून इथे आबालवृद्ध पर्यटकांना ,अपंगांना जेष्ठांना या सुंदर स्थळा पासून वंचित राहावे लागणार नाही. इच्छा असून सुद्धा असंख्य जेष्ठ पर्यटक केवळ इथे चांगल्या दर्जाची वाहतूक व्यवस्था नसल्याने येऊ शकले नाहीत त्याच्यासाठी ई रिक्षा हाच एकमेव पर्याय उपलब्ध होणार आहे.ई रिक्षा सुरू झाल्यानंतर ई रिक्षाची संख्या मर्यादित राहिली पाहिजे व इतर वाहनांना आत मध्ये प्रवेश दिला जाऊ नये अशी हॉटेल व्यावसायिकांची मागणी आहे त्यामुळे ई रिक्षाचे योग्य नियोजन करणे हे माथेरान नगरपालिका व सनियंत्रण समिती साठी आव्हानात्मक काम असणार आहे.

माथेरानची प्रगती केवळ वाहतुकीच्या जुन्या रुढी परंपरा पाळत आल्या मुळे जगाच्या पाठीवर मागासलेल्या आफ्रिकेतील काही जंगलातल्या आदिमानव या सारखी जमातीतील लोंकांसारखी झाली आहे.

आज जग २१ सदी कडे चालले आहे प्रगती च्या नव्या नव्या मार्गाकडे वाटचाल करीत आहे आणि केवळ काही स्वार्थापोटी मूठभर लोकांच्या मुळे येणाऱ्या पिढीचे अतोनात नुकसान होणार आहे हि बाब त्यांच्या ध्यानात येत नाही की पुढील पिढीत त्यांची पिढी सुधा आहे ती, वाहतुकीमुळे शिक्षण तसेच रोजगार याची त्रासदायक होणारी समस्या दूर होणार आहे. येणाऱ्या वृध्द, अपंग यांना सुधा निसर्गाची मनसोक्त आनंद घेता येईल. व्यापारी यांची दळणवळण मुळे प्रगती आणि आर्थिक विकास साधता येईल. रात्री बेरात्री येणारा पर्यटक किंवा स्थानिक यांना हा प्रश्न भेडसावणार नाही. दूरदृष्टी ठेवून जर विरोध करणारे यांनी संमजस भूमिका घेतली तर त्यांना सुधा आपण निर्णय घेतल्यालाचा त्यांना चांगला अनुभव येईल हि मला खात्री आहे. सर्वांचे हित हेच आपल्या गावाचे हित साधले तर प्रगती हि निश्चित भविष्यात आहे, असे ज्ञानेश्वर बागडे म्हणाले.

## आरोग्य यंत्रणा दर्जेदार वैद्यकीय सेवेसाठी कटिबद्ध : डॉ.सुहास माने

**दै.रायगड नगरी । दिघी**

समाजातील तळागाळातील घटकांचे आरोग्य सदृढ रहावे प्रत्येकाला चांगल्या स्वरूपात आरोग्यसेवा मिळावी त्या दृष्टिकोनातून जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा दर्जेदार वैद्यकीय सेवा देण्यासाठी कटिबद्ध आहे असे प्रतिपादन रायगड जिल्ह्याचे शल्यचिकित्सक डॉक्टर सुहास माने यांनी केले आहे.

उपजिल्हा रूग्णालय श्रीवर्धन येथे केंद्र शासनाच्या दिव्यांग व्यक्ती अस्मिता अभियाना अंतर्गत आयोजित दिव्यांग प्रमाणपत्र वाटप कार्यक्रम प्रसंगी डॉक्टर सुहास माने यांनी उपस्थितांशी संवाद साधला. रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यातील वैद्यकीय अधीक्षक आज श्रीवर्धनमध्ये आले. श्रीवर्धन तालुक्यातील दिव्यांग बांधवांना त्यांच्या विविध अडचणींचा निर्मूलन करण्यासाठी महत्त्वाचे असलेले दिव्यांग प्रमाणपत्र आज रोजी वितरीत करण्यात येत आहेत. एकता दिव्यांग कल्याणकारी संस्था श्रीवर्धन मध्ये अतिशय चांगल्या स्वरूपाचं काम करत आहे. तालुक्यातील दिव्यांग बांधवांच्या समस्यांचे निर्मूलन करणे गरजेचे आहे. वैद्यकीय क्षेत्रातील प्रत्येक घटक आत्म समर्पित भावनेने कार्य करत आहे. कोरोना सारख्या महामारीचा आपण सर्वानी जिद्दीने सामना केला आहे. कोरोना प्रसंगी वैद्यकीय क्षेत्रातील कर्मचारी वर्गाने प्रयत्नांची पराकाष्टा करत निष्ठेने आपले कर्तव्य पार पाडले आहे. वैद्यकीय यंत्रणा दिव्यांग बांधवांच्या सदैव पाठीशी आहे असे डॉ सुहास माने यांनी सांगितले आहे. सदर कार्यक्रम प्रसंगी श्रीवर्धन प्रांताधिकारी अमित शेडगे व जिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉक्टर मधुकर ढवळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिव्यांग संघटनेचे श्रीवर्धन तालुकाध्यक्ष नीलेश नाक्ती यांनी केले. सदरच्या कार्यक्रमात उपजिल्हा रुग्णालय श्रीवर्धनचे अधीक्षक डॉक्टर मधुकर ढवळे यांचा जिल्ह्यातील डॉक्टरांच्या वतीने निरोप समारंभ साजरा करण्यात आला. सदरच्या शिबिरामध्ये श्रीवर्धन तालुक्यातील मतिमंद, अंध, अस्थिव्यंग रुग्णांची चिकित्सा करून त्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. रायगड जिल्ह्यातील म्हसळा माणगाव, महाड, अलिबाग, कर्जत, पनवेल येथील वैद्यकीय अधीक्षक कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

## तळा बाजारपेठेतील रस्त्याच्या काँक्रीटीकरणास सुरुवात

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा नगरपंचायतीवर राष्ट्रवादी पक्षाची एकहाती सत्ता असून निवडणूक काळात दिलेल्या आश्वासनाची पुर्तता करण्यात सुरुवात झाली असून शहरातील बाजारपेठेतील रस्त्याच्या काँक्रीटीकरणास सुरुवात झाली आहे.

तळा शहराच्या विकासा साठी मंजूर करण्यात आलेल्या २ कोटी ६३ लाख रुपयांच्या विकासकामांसाठीच्या निधीतील जवळपास ५४ लक्ष रु. हे काम असूनतळा बसस्थानक ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक पर्यंतच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे.हे काम सुरू असताना एसटीच्या वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ नये यासाठी बसस्थानकापासून काही भाग पुढे रस्त्याचे खोदकाम सुरू करण्यात आले आहे. जेणेकरून एसटी बसस्थानकात जाण्यास व गाडी वळविण्यास सोपे जाईल. हे काम पूर्ण झाल्यानंतर उर्वरित अस–लेले बस स्थानकाजवळील काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. या कामाला २२ मे पासूनच सुरुवात करण्यात येणार होती. परंतु सध्या सर्वत्र लग्न सोहळे पार पडत असल्यामुळे शहरातुन आलेल्या चाकर मान्यांची खरेदीसाठी गैरसोय होऊ नये यासाठी या कामाला एक आठवडा उशिरा सुरुवात करण्यात आलीआहे. बाजारपेठेतील रस्त्याच्या काँक्रीटीकरणास सुरुवात झाल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत असून दरवर्षी पावसाळ्यानंतर कराव्या लागणाऱ्या खड्डेमय प्रवासातून नागरिकांची सुटका होणार आहे.



## कामोठे येथे २१३ निरंकारी भक्तांचे उत्स्फूर्त रक्तदान



**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

संत निरंकारी मिशनच्या वतीने लोकनेता रामशेठ ठाकुर पब्लिक स्कूल, प्लॉट नं.४०, सेक्टर ६ए, कामोठे, नवी मुंबई येथे रविवार, दिनांक २९ मे, २०२२ रोजी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरामध्ये २१३ निरंकारी भक्तांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. रक्त संकलनाचे कार्य संत निरंकारी रक्तपेढी, विलेपार्ले, मुंबई मार्फत करण्यात आले.

सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या समर्पित भावाने मानवतेची सेवा करण्याची प्रेरणा देणाऱ्या शिकवणूकीनुसार नेरुळ ते पनवेल परिसरातील निरंकारी भक्तांनी या रक्तदान शिबिरामध्ये मोठ्या उत्साहाने भाग घेतला.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन प्रशांत ठाकुर आमदार तथा पनवेल तालुका प्रमुख यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी डॉ अरुण भगत, नगरसेवक व आरोग्य सभापती, पनवेल शहर उपस्थित होते. या रक्तदान शिबिराला अरुण पाटील, क्षेत्रीय संचालक अशोक केरेकर यांनी सदिच्छा भेट दिली. सर्व मान्यवरांनी संत निरंकारी मिशनच्या मानवतावादी कार्याचे आणि निष्काम समाज सेवेचे कौतुक केले.

संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या माध्यमातून या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले ज्यामध्ये मंडळाचे स्थानिक सेक्टर संयोजक वसंत गुंड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक मुखी आणि सेवादल अधिकारी व स्वयंसेवक तसेच संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनचे स्वयंसेवक यांनी महत्वपूर्ण योगदान दिले.

# धोकादायक कुंडी धबधबा बुजविला



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील मौजे वाजे गाव येथील अर्पिता फार्म शेजारी एक जी–वघेणा कुंडी धबधबा आहे. सदर धबधब्याजवळ कोणी जाऊ नये याकरिता दरवर्षी बंदोबस्त ठेवला जातो परंतु काही तरुण हे पोलिसांची नजर चुकवून सदर धबधब्यात उतरतात परंतु पाण्याचा प्रचंड वेग व मोठ्या बोवऱ्यात ते अडकून राहिल्याने पाण्यात बुडून मयत होतात. दरवर्षी अनेक अल्पवयीन मुले व नवतरुण बुडून मृत्युमुखी पडत असत.

त्यावर कायमचा प्रतिबंध व्हावा याकरिता .पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पनवेल शिवराज पाटील व सहाय्यक पोलीस आयुक्त पनवेल विभाग भागवत सोनवणे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र दौंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक वाजे ग्रामपंचायत कमिटी, मंडळ अधिकारी अजित पवार व वन खात्याचे आरएफओ सोनवणे यांच्या मान्यतेने व उपस्थितीत सदर कुंडी धबधब्यात ज्या ठिकाणी पावसाच्या पाण्याने मोठा १० ते १५ फुटाचा खड्ड्यात पाण्याचा भवरा तयार होतो तो खड्डा पोकलेन मशिन व नियंत्रित ब्लास्टिंगच्या साहाय्याने संपूर्ण दगडांचा भराव करून कायमचा बुजविण्यात आलेला आहे. त्यामुळे आता तेथे कोणतीही दुर्घटना होणार नाही. सदर कामगिरी यशस्वी होणेसाठी पोलीस ठाणे कडील पोहवा ओंबासे, पोना जयदीप पवार व पोशि भोये यांनी विशेष मेहनत घेतली.

## अश्लील वर्तन करणाऱ्या पतीकडे जाब विचारला असता पत्नीला जबर मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील वाकडे गावात राहणाऱ्या एका कुटुंबामध्ये आपला पती राहत्या घरातच अश्लील वर्तन करत असल्याने या बाबत पत्नीने त्याला जाब विचारला असता तिला जबरी मारहाण केल्याने तीला उपचारार्थ नजीक च्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या दोघा पती पत्नी मध्ये नेहमीच वादविवाद होत असत त्यातच पति अश्लील वर्तन करत असल्याचे पाहून या बाबत पत्नीने त्याच्याकडे विच–ारणा केली असता पतीने रागाच्या भरात लाकडी फळीने मारहाण करून तिला जीवे ठार मारण्याचा प्रयन्त केला.

याबाबत पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून पतिला अटक करण्यात आली आहे.

## सायकल रिपेरिंगच्या दुकानामध्ये जबरी चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शहरातील एक सायकल रिपेरिंग च्या दुकानांमध्ये जबरी चोरी करून जवळ पास वीस हजार सहाशे रोख रक्कम लंपास केल्याची घटना घडली आहे.

परेश जैन यांच्या सायकल रिपेरिंगच्या दुकानाचे शटर उचकटून आत प्रवेश करून कॅश काउंटर च्या आत मध्ये ठेवलेले वीस हजार सहाशे रोख रक्कम लंपास केल्याने या बाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## ३० रूपयात ८० किमी ; पत्रकाराने तयार केली इलेक्ट्रिक कार




**दै.रायगड नगरी । तळा**

सध्या जगभरात पर्यावरणासाठी घातक ठरणारं वायू प्रदूषण टाळण्यासाठी पेट्रोल–डिझेलवर धावणाऱ्या वाहनांपेक्षा विजेवर चालणाऱ्या वाहनांना प्रोत्साहन दिलं जात आहे. आपल्या देशातही अलीकडच्या काळात इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला चालना देण्यासाठी सरकारतर्फे अनेक योजना राबवल्या जात असून, अनेक वाहन उत्पादक कंपन्याही इलेक्ट्रिक कार्सची निर्मिती करत आहेत. त्यांच्या किमती कमी करता याव्यात, त्यांचा वापर अधिकाधिक सहज व्हावा यासाठी संशोधन सुरू असून, सरकारी पातळीवर, तसंच वाहन कंपन्यांच्या स्तरावर देखील विद्यार्थ्यांना नावीन्यपूर्ण वाहननिर्मितीसाठी प्रोत्साहन दिलं जात आहे. यासाठी अनेक स्पर्धांचं आयोजन केलं जातं. या पार्श्वभूमीवर सध्या चर्चा आहे ती रायगड जिल्ह्यातील तळा तालुक्यातील एका पत्रकाराने तयार केलेल्या अनोख्या इलेक्ट्रिक कारची.

तळा शहरात पुसाटी इथला रहिवाशी असलेला आणि सध्या केबल ऑपरेटर आणि पत्रकार असलेल्या विराज वसंत टिळक याने अवघ्या ३० रुपयांमध्ये ८० किलोमीटर्स धावणारी इलेक्ट्रिक कार बनवली असून, यासाठी फक्त दीड लाख रुपये खर्च आला आहे. विशेष म्हणजे, या दोन सीटर कारचा लूक जीपसारखा आहे. त्यामुळे ती दिसतेही अत्यंत आकर्षक त्याचबरोबर आधुनिक कारमध्ये असणाऱ्या सर्व आधुनिक सुविधा त्या कारमध्ये आहेत. तिची बॅटरी सुमारे ४ तासांत पूर्ण चार्ज होते.

एकीकडे पेट्रोल आणि डिझेलच्या किंमती प्रचंड वाढत आहेत, तर दुसरीकडे पर्यावरणाचंही प्रचंड नुकसान होत आहे, याचा विचार करून ही इलेक्ट्रिक कार बनवण्यात आली असल्याचं विराज टिळक यानं सांगितलं. एकदा चार्ज केल्यानंतर ती ८० किलोमीटर्स धावेल. त्यासाठी फक्त ३० रुपये खर्च येईल. ही कार आधुनिक वाहनांसारखी बनवण्यात आली असून इतर वाहनांप्रमाणे त्याचा स्पीडोमीटर गती, तसंच बॅटरी पॉवर दाखवतो. ही कार १ तासात ३० किलोमीटर अंतर कापते. यात रिव्हर्स मोडसाठी देखील सुविधा उपलब्ध आहे. याशिवाय त्यामध्ये एमसीबी बॉक्सचीही व्यवस्था करण्यात आली आहे, जेणेकरून कोणताही बिघाड लगेच लक्षात येईल.

या कारमध्ये सीटखाली बॅटरी बसवण्यात आली असून, बॉनेटखाली स्टेपनी बसवली आहे. इतर कोणत्याही कारप्रमाणे हिला हँड ब्रेक आहे असंही विराज टिळक यानं सांगितलं. सध्या सर्वत्र या कारची चर्चा असून या कारचा फॉर्म्युला ऑटोमोबाइल कंपन्यांना आवडला तर इलेक्ट्रिक वाहनांच्या बाजारपेठेला नवी दिशा मिळेल, असं मानलं जात आहे. विराज टिळक याचं या अनोख्या कारच्या निर्मितीबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. लॉक डाऊनच्या काळात आर्थिक संकटाना सामोरे जावे लागले, तालुका हा दुर्गम डोंगराळ आहे येथे उत्पन्नाचे कोणतेच साधन नाही रोजगानिर्मिती व्हावी या दृष्ककोनातून हा प्रयोग केला आहे आणि त्यात यशस्वी झालो असल्याचे विराज टिळक यांनी सांगितले.

## सुख-दु:खाची वीण घट्ट विणून प्रपंच नेटका करावा : मारुती महाराज कोलटकर

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**


सुख–दु:खाची वीण घट्ट विणून प्रपंच नेटका करावा अशाप्रकारचे भक्तीमय उद्गार ह.भ.प.रायगड भूषण मारूती महाराज कोलटकर यांनी आपल्या किर्तनरूपी सेवेप्रसंगी काढले.

रोहे तालुक्यातील वैजनाथ गावचे जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते धोंडू देऊ मोरे यांचे वयाच्या सुमारे ६५ व्या वर्षी ह्दयविकाराने दु:खद निधन झाले. त्याप्रित्यर्थ ता.२९ मे रोजी त्यांच्या अंतिम धार्मिक विधीप्रसंगी आयोजित करण्यात आलेल्या हरिकिर्तनरूपी सेवेप्रसंगी ह.भ.प. मारुती महाराज कोलटकर बोलत होते. या सेवेप्रसंगी समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितीतांना संबोधित करताना मारूती महाराज कोलटकर यांनी कै.धोंडू देऊ मोरे यांचे समाजासाठी व आपल्या गावासाठी फार मोठे मोलाचे योगदान होते.तर आपल्या संपूर्ण परिवारास एक आधारभूत व्यक्तिमत्त्व होते.असे सांगतानाच ज्या आई–वडीलांचे पोटी आपण जन्माला येतो,त्यांचे अगणित ऋण आपल्यावर असल्यामुळे त्यांच्याप्रती सदा क्रुतज्ञ असावे असे शेवटी मार्गदर्शन केले.

## रायगड जिल्ह्यातील व्यापाऱ्यांना अन्न व सुरक्षे संदर्भात ऑनलाईन प्रशिक्षण बंधनकारक

**दै.रायगड नगरी । माणगाव**

केंद्र सरकारच्या अन्न सुरक्षा प्रशिक्षण प्रमाणपत्र या योजने अंतर्गत रायगड जिल्ह्या–तील सर्व तालुक्यातील खाद्य पदार्थ विक्रेते व्यावसायिकांना अन्न व औषध प्रशासना तर्फे ऑनलाईन प्रशिक्षण तसेच कोरोना प्रादुर्भावाबाबत मार्गदर्शन केले जाते. सर्व व्यावसायिकांना प्रशिक्षण घेणे बंधनकारक केले असून सर्व व्यापारी व व्यवसायिकांनी महाराष्ट्र शासनाने ट्रेनिंग पार्टनर म्हणून नियुक्त केलेल्या फाँस्टेक कंपनीचे रायगड जिल्हा नोडल ऑफिसर विद्यानंद अधिकारी यांनी व्यापारी व व्यवसायिकांना शासनाच्या या योजनेत सहभागी होण्याचे आवाहन केले. रायगड जिल्हातील सर्व तालुक्यामध्ये



व्यवसायिकांचा या योजनेस उस्फुर्त प्रतिसाद मिळत असून याच वेळी माणगाव तालुका पंचायत समितीचे उप सभापती सुजीत शिंदे रास्त भाव धान्य दुकानदार मौजे चांदोरे यांनी माणगांव ऑफिसमध्ये येऊ आपली ऑनलाईन ट्रेनिंग नोंदणी पावती स्विकारली. केंद्र शासनाच्या या योजने अंतर्गत महाराष्ट्रातील जिल्हा व ग्रामीण भागातील सर्व खाद्यपदार्थ विक्री करणारे शहरी व ग्रामीण भागातील व्यवसायिकांना हे प्रशिक्षण अनिवार्य असून सर्व जिल्हा फाँस्टेक कंपनीचे प्रतिनिधी हे दुकानदार व्यावसायिक यांना जाऊन माहिती देत आहेत व ऑनलाईन ट्रेनिंग नोंदणी पावती, देत आहेत तसेच यामध्ये हॉटेल व्यावसायिक, बेकरी, खानावळ, किराणा दुकानदार, फळ विक्रेते, चहा विक्रेते, वडापाव स्टॉल, पान टपरि, स्वीटमार्ट, डेरी, धान्य दुकानदार, आदीसाठी हे प्रशिक्षण उपयुक्त ठरणार असल्याने जास्तीत जास्त व्यवसायिकांनी याचा लाभ आपल्या विभागात प्रतिनिधी आला तर घ्यावे असे आवाहन विद्यानंद अधिकारी यांनी प्रतिनिधी जवळ बोलताना सांगितले.